मंगळवार, दि. ४ मार्च २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २१३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालन्यात आजपासून वॉटरशेड यात्रा

### चार गावामध्ये विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत पाणलोट विषयक कामाचे महत्त्व विशद करून या कामात लोकांचा सहभाग वाढावा या दृष्टीने जनजागृती व प्रसिद्धी करण्यासाठी केंद्र शासनाच्या भूसंसाधन विभाग व मृद व जलसंधारण विभाग म हाराष्ट्र राज्य व वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यामध्ये वॉटरशेड यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे सदर यात्रेच्या रूट मॅप नुसार जिल्ह्यात ४ मार्च रोजी वॉटरशेड यात्रा येणार आहे. ही यात्रा जाफ्राबाद व अंबड तालुक्यातील ४ गावात जाणार असून ५ तारखेपर्यंत जिल्ह्यामध्ये राहणार आहे. यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. मृदा व जलसंधारण विभाग, जालना यांच्या अंतर्गत जिल्ह्यातील जाफ्राबाद तालुक्यात एक व अंबड तालुक्यातील एक क्लस्टर मध्ये पाणलोट कामे म ागील तीन वर्षापासून सुरू आहेत. या कामाविषयी जनजागृती करून कामाची माहिती ग्रामीण भागातील जनतेला व्हावी यासाठी सरकारने वॉटरशेड यात्रा सुरू केलेली आहे. ही यात्रा एका दिवसात दोन गावे करणार असून या गावात विविध कार्यक्रम घेतले जात आहेत. या रथयात्रेची सुरुवात जाफ्राबाद तालुक्यातील माहोरा या गावापासून चार मार्च रोजी सकाळी ९.00 वाजता होणार आहे. तसेच दुपारी २ वाजता यात्रा आरदखेडा गावात दाखल होईल. ५ मार्च रोजी ही यात्रा अंबड तालुक्यातील खेडगाव व रोहिलागड या गावांमध्ये यात्रा जाणार आहे. यानिमित्त प्रत्येक गावात यात्रेनिमित्त प्रभात फेरी, ग्रामसभा, महीला बचतगट बैठका आदी कार्यक्रम घेण्यात आले आहे. या यात्रेत ग्रामस्थांनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ, जिल्हा जलसंधारण अधिकारी एस.एस. वाघमारे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी ऋतुजा देसाई, जिल्हा प्रकल्प समन्वयक तुकाराम भोजने आदींनी केले आहे.

**विविध स्पर्धाचे आयोजन**

वॉटर शेड यात्रेनिमित्त गावात वातावरण निर्मिती व्हावी यासाठी चार गावात जिल्हा परिषद प्राथमि क शाळेतील शालेय विद्यार्थ्यांच्या सगळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा घेण्यात आले आहेत. या स्पर्धेतील यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना यात्रेतील मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. या कार्यक्रमात पाणलोट योद्धायोध्दा व धारिणी ताई यांनाही सन्मान चिन्ह दिले जाणार आहे.

**मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून प्रसार**

वॉटर शेड यात्रेमध्ये शासनाकडून मोबाईल व्हॅन उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या व्हॅन मध्ये प्रकल्पाच्या संबंधित माहिती देण्यात येईल. तसेच पाणलोट विषय कामाच्या चित्रफिती या याच्या म ाध्यमातून ग्रामस्थांना दाखविल्या जातील. हा रथ गावात दाखल झाल्यानंतर सुरुवातीला प्रकल्पाचा प्रसार व प्रचार केला जाईल.

**ग्रामस्थांना दिली जाणार शपथ**

वॉटरशेड यात्रा गावात दाखल झाल्याच्या नंतर प्रमुख वक्त्यांचे मार्गदर्शन होईल. यानंतर शालेय मुलांच्या स्पर्धांचे बक्षीस वितरण केले जाईल. गावातील युवक, महिला बचत गटाच्या सदस्य व स्वयंसेवक एकत्र येऊन श्रमदान करतील व परिसरात वृक्ष लागवड करण्यात येईल. यानंतर ग्रामस्थांना हातात माती घेऊन पाणलोट विषयी शपथ दिली जाणार आहे.

वरील माहिती जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

## शेतकरी पुन्हा आक्रमक;

### मागण्या मान्य झाल्याशिवाय आता माघार नाही - दिलीप राठी

**जालना । प्रतिनिधी -** महिनाभरापुर्वी प्रशासन आणि आ. अर्जुनराव खोतकर यांच्या मध्यस्थीने आंदोलन स्थगित केले होते. त्यावेळी एका म हिन्याचा वेळ प्रशासनाला दिला होता हा वेळ संपत आला असून आता पुढील आठवड्यापासून आंदोलन सुरु करण्यात येणार असल्याचे दिलीप राठी यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले. देवमुर्ती परिसरात सोमवार (दि ३) रोजी शेतकऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीनंतर ते माध्यमांशी बोलत होते.

श्री राठी म्हणाले की, शेतीचे योग्य मुल्यांकन व्हावे, शेतीतील झाडे, विहिर आदींचे नोंद घ्यावी त्यांचा योग्य मोबदला शेतकऱ्यांना मिळावा अशी आमची मागणी होती. यावर प्रशासनाने मागण्याबाबत सकारात्मकता दाखविली होती. व एक महिन्याचा वेळ घेतला होता. हा एक म हिन्याचा वेळ आता संपला आहे. मात्र, शासनाने अद्यापही कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही. त्यातच उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री यांनी अजित पवार यांनी तुगलकी कारभाराची प्रचिती देत म हामार्ग रद्द करण्यात येणार असल्याचे विधान केले ही जहागिरी, हुकुमशाही झाली. एकीकडे निविदा काढल्या म्हणजे महिनाभरापुर्वी त्यांच्याकडे पैसे होते आता म्हणताहेत पैसा नाही महामार्ग रद्द करू. त्यांनी महामार्ग रद्द करावा आम्ही खुश आहोत. यास आमची मान्यता आहे. मात्र, हे शक्य नाही हा बोलाचाच भात बोलाचीच कढी आहे. त्यामुळे आता कुठे असे वाटायला लागले आहे की, शासन चालढकल करीत आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी मिळून ठरविले आहे की, आता पुन्हा आंदोलन उभा करायचे आहे. आता शंभर टक्के मागण्या मान्य होईपर्यंत माघार घेणार नसल्याचेही सर्व शेतकऱ्यांनी ठरविले असल्याचे श्री राठी यांनी सांगितले. प्रशासनाला एक आठवड्याची मुदत द्यायची नंतरचे आंदोलन शासनाला आता परवडणारी नसल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

अर्थमंत्री झाले म्हणजे महाराष्ट्र त्यांना आंदण दिलेला नाही. याला दिले त्याला टाळले अशी सापत्न वागणूक सरकारला देता येणार नाही. म हामार्ग रद्द होणार नाही, यामुळे हजारो कोटींचे नुकसान शासनाचे होणार आहे. हा पैसा करातून आलेला आहे. रद्द होणार म्हणणे म्हणजे वेळ मारून नेण्याचा प्रयत्न चालविला आहे. निविदा निघाल्या अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या गेल्या त्यांना मोबदला दिला गेला. कंत्राटदारांनी त्यांचे काम सुरु केले आहे. बुलडोजर आलेले आहेत. त्यामुळे हा महामार्ग रद्द होणार नाही. आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर देवमुर्ती पुरता विषय सांगतो येथील एक इंच जागाही आम्ही देणार नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा ड्रीम प्रोजक्ट आहे. ते या प्रकल्पासाठी आग्रही आहेत. मात्र, अजित पवार यासाठी दुराग्रही आहेत. त्यांना मराठवाड्याशी काही देणेघेणं नाही, त्यांना केवळ पश्चिम महाराष्ट्राशी देणेघेणं आहे. त्यांनी हे सर्व थांबवावं, शेतकऱ्यांना हलक्यात घेऊ नका, त्यांना देशोधडीला लावण्याचं काम अजित पवार करत आहे. शेतकरी उधडून टाकतील असा ईशारा यावेळी त्यांनी दिला.

## महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी २७ मार्चला मतदान

**मुंबई । प्रतिनिधी -** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणूक जाहीर केली आहे. महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे निवडून दिल्या जाणाऱ्या विधानपरिषदेच्या ५ जागा सदस्यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झाल्या आहेत.

आमदार सर्वश्री आमश्या फ ुलाजी पाडवी यांचा विधानपरिषद सदस्य म्हणून ७ जुलै २०२८ पर्यंत कालावधी, प्रविण प्रभाकरराव दटके (१३ मे २०२६), राजेश उत्तमराव विटेकर - (२७ जुलै २०३०), रमेश काशिराम कराड - (१३ मे २०२६) आणि गोपीचंद कुंडलिक पडळकर यांचा कार्यकाळ समाप्ती १३ मे २०२६ असा आहे. मात्र, या सदस्यांची दि. २३ जुलै २०२४ रोजी महाराष्ट्र विधानसभा सदस्य म्हणून निवड झाल्याने भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेकरिता द्वैवार्षिक निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. या निवडणुकीसाठी सोमवार, १० मार्च २०२५ रोजी अधिसूचना जारी केली जाईल. सोमवार, १७ मार्च, २०२५ पर्यंत उमेदवारांना नामांकन अर्ज दाखल करता येईल. उमेदवारांनी दाखल केलेल्या नामांकन अर्जांची छाननी मंगळवार, १८ मार्च, २०२५ रोजी केली जाईल,

युवा आदर्श

**प्रतिनिधी ...**

संसदभवन आपले
असते अमोल ठेवा
सर्वांअसे अभिमान
पावित्र्य राखून ठेवा
कामकाज असे हवे
सगळे करी वाहवा
चर्चा रे सकारात्मक
विचार झरा वहावा
वाद विवाद संपावा
पायंडा नवा पडावा
विधायक विधेयका
उगा विरोध सोडावा
रयतेचा नेत्यावरती
संपूर्ण विश्वास हवा
आपले ते प्रतिनिधी
नको केवळ ही हवा
बहिष्कार गोंधळांस
मिळो जरा विसावा
कायदा सु व्यवस्था
विश्वास बा बसावा
सत्ताधारी विरोधकां
दुरावा कधी नसावा
दोन्ही जनतेचे सेवक
लोकशाही रे विसावा
अधिवेशन स्वर्णसंधी
फायदा जरूर घ्यावा
प्रत्येकक्षण अनमोल
जन स्तकार्या द्यावा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## प्रगतीशील, विकसित महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने वाटचाल - राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन

### राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनास राज्यपालांच्या अभिभाषणाने सुरूवात



**मुंबई । प्रतिनिधी -** शेतकरी, महिला, समाजातील दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी त्याचसोबत आरोग्य, रोजगार,उद्योग,पायाभूत सोयी सुविधांच्या बळकटीकरणास शासनाचे प्राधान्य आहे. राज्य शासन सर्व सम ाजघटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक, प्रगतीशील, पुरोगामी व विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी काम करीत आहे असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अभिभाषणात केले.

**शेतकरी हितास प्राधान्य**

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन म्हणाले की, राज्यशासन कृषी क्षेत्रातील संधीचा विस्तार करून शेतकरी हितास प्राधान्य देणारे निर्णय घेत आहे. राज्यामध्ये सौरऊर्जा पंपांद्वारे शेतीकरिता पाणी मि ळण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करण्याकरिता मागेल त्याला सौर पंप योजना या अंतर्गत, ३,१२,000 सौर पंप बसविले आहेत. या योजनेअंतर्गत, पाच वर्षांमध्ये शेतकऱ्यांना १० लाख सौर पंप पुरविण्यात येतील. प्रधानमंत्री-कुसुम व मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना या अंतर्गत राज्यातील सर्व कृषी वाहिन्या सौरऊर्जाकृत करणारे देशातील पहिले राज्य बनण्याचे लक्ष्य महाराष्ट्राने ठेवले आहे. राज्याने केवळ नऊ महिन्यांच्या विक्रमी वेळेत १४७ मेगावॅट एकत्रित सौरऊर्जा क्षमतेच्या एकूण ११९ वाहिन्या कार्यान्वित केल्या आहेत.जालना जिल्ह्यामध्ये,परिसरातील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना पाठबळ देण्यासाठी, रेशीम कोशांची खरेदी व विक्री करण्यासाठी खुली बाजारपेठ उभारली आहे. बाजारपेठेचे पान ३ वर



## संपादकीय पान

# जंगलतोड व वाढत्या प्रदुषणामुळे वन्यजीव धोक्याच्या उंबरठ्यावर

## फिरकीचा जादूगार

बरोबर तीन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी ( ४ मार्च २०२२ ) क्रिकेट विश्वाला धक्का देणारी बातमी आली आणि या बातमीने संपूर्ण क्रिकेट विश्वावर शोककळा पसरली. ही बातमी होती फिरकीचा जादूगार ऑस्ट्रेलियाचा महान लेग स्पिनर शेन वॉर्न यांच्या निधनाची. शेन वॉर्न असा अकाली निघून गेल्याने क्रिकेट विश्वाला जबर धक्का बसला. वयाच्या अवघ्या ५२ व्या वर्षी या महान गोलंदाजाने जगाचा निरोप घेतला. शेन वॉर्न हा केवळ ऑस्ट्रेलियाचाच नाही तर जगातला सर्वोत्तम फिरकी गोलंदाज होता. आपल्या फिरकीच्या तालावर त्याने जगातील सर्वच दिग्गज फलंदाजांना नाचवले. जवळपास वीस वर्ष त्याने आपल्या फिरकीच्या बळावर क्रिकेट विश्वावर राज्य केले. १३ सप्टेंबर १९६९ रोजी ऑस्ट्रेलियाच्या फॉन्टरी गली येथे जन्मलेल्या शेन वॉर्नने जेंव्हा फिरकी गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तेंव्हा त्याला सर्वांनी वेड्यात काढले कारण ऑस्ट्रेलिया म्हणजे वेगवान गोलंदाजांची भूमी खेळपट्ट्या वेगवान त्यामुळे तिथे त्याची फिरकी चालणार नाही असेच सर्वांचे मत होते. अनेकांनी त्याला फिरकी गोलंदाजी न करण्याचा सल्ला दिला मात्र त्याने कोणाचेही ऐकले नाही. तो आपल्या निर्णयावर ठाम राहिला. देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याने चमकदार कामगिरी करून निवड समितीचे लक्ष वेधले. सातत्याने चांगली गोलंदाजी केल्याने अखेर त्याला ऑस्ट्रेलियाच्या मुख्य संघात प्रवेश मिळाला. १९९२ साली त्याने भारताविरुद्धच त्याने आपली पहिली कसोटी खेळली मात्र या कसोटीत त्याला विशेष काही करता आले नाही. भारताच्या फलंदाजांनी त्याची गोलंदाजी लीलिया खेळून काढली. याच कसोटीत भारताचा सलामीवीर रवी शास्त्रीने द्विशतक केले. पहिल्या कसोटीत विशेष काही करता न आल्याने त्याच्यावर टीकाही झाली. तो आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी होणार नाही असाही तर्क अनेकांनी काढला मात्र त्याने हार मानली नाही. टिकाकारांकडे दुर्लक्ष केले आणि आपल्या गोलंदाजीवर लक्ष केंद्रित केले. त्याचे फळ त्याला लवकरच मिळाले. इंग्लंड विरुद्धच्या प्रतिष्ठेच्या ऍशेस मालिकेत त्याने इंग्लंडच्या फलंदाजांना सलो की पळो करून सोडले. आपल्या फिरकीच्या बळावर त्याने ही मालिका ऑस्ट्रेलियाला एकहाती जिंकून दिली. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नची फिरकी समजलीच नाही. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नने अक्षरशः मामा बनवले. याच मालिकेत शेन वॉर्नने असा चेंडू टाकला की ज्याने फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच अचंबित झाले. शेन वॉर्नने इंग्लंडच्या माईक ग्याटिंग ऑफ साईडला चेंडू टाकला. ग्याटिंगला वाटले की चेंडू ऑफ स्टंपच्या बाहेर असल्याने तो वाईड ठरेल म्हणून त्याने तो सोडून दिला मात्र चेंडूने अचानक १८० अंशात वळून चक्क गाटिंगचा लेग स्टंपवर धडकला. या चेंडूने केवळ फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच हादरून गेले. असा चेंडू यापूर्वी क्रिकेट विश्वात कोणत्याची गोलंदाजाने टाकला नव्हता म्हणूनच या चेंडूला बॉल ऑफ सेंच्युरी असे म्हणतात. न भूतो न भविष्यती असा तो चेंडू होता. १९९३ साली शेन वॉर्नने हा स्वप्नवत चेंडू टाकला. आज इतक्या वर्षानंतरही हा चेंडू क्रिकेट रसिकांच्या स्मरणात आहे. शेन वॉर्नची गोलंदाजीची शैली अनोखी होती. या अनोख्या शैलीनेच त्याने १४५ कसोटीत ७०८ बळी घेतले. त्यातील ४४८ बळी हे ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमध्ये घेतले. येथे एक लक्षात घ्यावे लागेल की या दोन्ही देशातील खेळपट्ट्या वेगवान गोलंदाजीसाठी पोषक असतात. वेगवान खेळपट्ट्यांवर इतके बळी मिळवणे ही अनन्यसाधारण गोष्ट आहे. त्याने १४५ कसोटीत खेळताना ३७ वेळा एका डावात ५ किंवा त्यापेक्षा अधिक बळी घेतले आहेत तर तर कसोटीत १० किंवा १० पेक्षा अधिक बळी त्याने १० वेळा घेतले आहेत. इतकेच नाही तर त्याने १९४ एकदिवसीय सामन्यात २९३ बळी घेतले आहेत. १९९९ साली इंग्लंडमध्ये झालेला विश्वचषक ऑस्ट्रेलियाने शेन वॉर्नच्या फिरकीच्या बळावरच जिंकला होता. शेन वॉर्नने जगभरातील दिग्गज फलंदाजांना आपल्या फिरकीच्या तालावर अक्षरशः नाचवले. सचिन आणि वॉर्न यांचे क्रिकेट मैदानावरील द्वंद्व क्रिकेट रसिकांसाठी पर्वणी ठरायचे. सचिनला बाद करण्यासाठी वॉर्न जंग जंग पछडायचा मात्र त्याला त्यात यश मिळायचे नाही. फिरकीचा जादूगार शेन वॉर्नला तिसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

---

वन्यजीव वाचविण्यासाठी पृथ्वीचे व निसर्ग सृष्टीचे रक्षण आवश्यक. २० डिसेंबर २०१३ रोजी, संयुक्त राष्ट्र महासभेच्या ६८ व्या अधिवेशनात, दरवर्षी ३ मार्च रोजी जागतिक वन्यजीव दिन साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. परंतु खरंतर, ३ मार्च १९७३ रोजी, वन्य प्राणी आणि वनस्पतींच्या लुप्तप्राय प्रजातींच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावरील अधिवेशन (सीआयटीईएस) सुरु झाले होते. त्यावेळेस जगातिल जंगलातील प्राणी आणि वनस्पती याबद्दल जागरूकता वाढविण्यासाठी थायलंडने प्रस्तावित केले होते.परंतु २० डिसेंबर २०१३ ला प्राण्यांच्या रक्षणासाठी अधिकृतपणे दरवर्षी ३ मार्चला जागतिक वन्यजीव दिवस साजरा करण्याचे जाहीर झाले तेव्हा पासून ३ मार्च जागतिक वन्यजीव दिवस साजरा करण्यात येतो.या मागचा उद्देश म्हणजे जंगलातील प्राण्यांचे संरक्षण करण्यासाठी कोणकोणते उपाय योजले जाऊ शकतात यासाठी दरवर्षी जागतिक वन्यजीव दिवस साजरा करण्यात येतो. पृथ्वीचा दीवसेंदीवस ह्रास होत आहे. यामुळे ऑक्सिजनची मात्रा कमी होत असुन जंगलातील प्राणीमात्रांवर व वनस्पतीवर विपरीत परिणाम होतांना दिसतो. याकरीता पृथ्वीला वाचवाण्यासाठी सर्वांनी संकल्प करण्याची गरज आहे.कारण पृथ्वीवरील संपूर्ण जीवसृष्टीचे रक्षण व्हायलाच हवे.सध्याच्या परीस्थितीत जगातील वाढती लोकसंख्या पृथ्वीतलावरील मोठे संकट आहे.यामुळे हवेतील ऑक्सिजनची मात्रा कमी होतांना दिसुन येते. कारण जगातील वाढत्या लोकसंख्येमुळे जंगलसंपदा छीन्न-विछीन्न झाल्याचे दीसुन येते.त्याचप्रमाणे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मोठ्या प्रमाणात कारखाने दीसुन येतात.यामुळे संपूर्ण जगात स्थलप्रदुषण,वायुप्रदूषण व जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात होतांना दिसते.कारखाण्याचा विस्तार जगातील सर्वच देशांनी वाढविला आहे.यामुळे पहीला प्रहार जंगलसंपत्तीवर झालेला दिसुन येतो. यामुळे वन्यजीव व वनस्पती धोक्याच्या उंबरठ्यावर दिसुन येते.याच कारणांमुळे आज पृथ्वीचे संतुलन डगमगतांना दीसुन येते.मानवाच्या अतिरेकामुळे पृथ्वीतलावरील भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक,सुनामी, महाप्रलय,महामारी,साथीचे रोग,अती पाउस,अती उष्णता,अती थंडी,समुद्राची पातळी वाढणे अशाप्रकारचे विनाशाकडे नेणाऱ्या घटना दीवसेंदीवस वाढतांना दीसत आहे व याचा परिणाम सर्वांनाच भोगावा लागतो आहे.याचे मुख्य कारण म्हणजे जंगल संपदा नष्ट होने ह्या संपूर्ण घटना मानवाने पृथ्वीवर अत्याचार केल्यामुळे दीसुन येतात.याचे प्रायश्चित्त वन्यजीव प्राण्यांसोबत संपूर्ण जीवसृष्टीला भोगावे लागत आहे. २१ व्या शतकात मानव इतका सामोरं गेला आहे की अनेक टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून अत्याधुनिक हतियार बनविण्याच्या शर्यती लागलेला आहेत.

आतातर बायोवेपन्स म्हणजे जैविक हतीयार बनविण्याची शर्यत लागली आहे.यामुळे पृथ्वी तहस-नहस होवू शकते आणि याचा पहिला प्रहार जंगलसंपदावर होतांना दिसतो.आज मानवाने जंगल संपत्तीची हत्या केल्यामुळे नदी-नाले,तलाव, विहिरी मोठ्या प्रमाणात आटलेले दीसतात.यामुळे जंगलातील प्राणीमात्रांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे.याकरीता जगातील संपूर्ण देशांनी प्राण्यांसाठी पाणवठ्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे.त्याचप्रमाणे पृथ्वीच्या तापमानात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होतांना दिसते आणि ग्लोबल वॉर्मिगमुळे सुध्दा पृथ्वीचे संतुलन डगमगायला लागले आहे.पृथ्वीवरील जंगलसंपदा कमी झाल्यामुळे व छोटे-मोठे तलाव आटल्यामुळे हिंसक पशु व जंगलातील इतर पशू (वाघ, बिबट्या, अस्वल, हरीण,बंदर) यांना जंगलात योग्य आहार व पाणी मिळत नसल्यामुळे शहराकडे धाव घेतांना दीसतात हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे यावर जागतिक पातळीवर अभ्यास व्हायला हवा. अशा अनेक कारणांमुळे पृथ्वीचा ह्रास होत आहे व जंगली प्राण्यांचा जिवन धोक्यात आलेले आहे.यावर उपाय शोधण्यासाठी जागतिक स्तरावर अनेक योजना राबविल्या जातात. आज जगात २०० हुन अधिक देश आहेत या देशांच्या तुलनेत लोकसंख्येचा विचार केला तर १००० कोटींच्या वर लोकसंख्या आहे.त्यामुळे संपूर्ण देशांनी पृथ्वीला वाचविण्याच्या उद्देशाने जागतिक वन्यजीव दिवसाच्या निमित्ताने प्रत्येक व्यक्तीने एकतरी झाड लावायला पाहिजे. कारण नैसर्गिक ऑक्सिजन टिकवून ठेवण्यासाठी जंगल वाचवीले पाहिजे, वृक्षारोपण केले पाहिजे आणि पृथ्वीला वाचविले पाहिजे.त्याचप्रमाणे जंगल तोडीमुळे जंगलातील प्राणी शहराकडे भटकतात त्यांच्यासाठी जगातील संपूर्ण देशांनी जंगलामध्ये छोटे-छोटे तलाव बांधुन जंगली प्राण्यांचे प्राण वाचवुन संगोपन करायला पाहिजे.कारण मानवाच्या अनेक चुकांमुळे अनेक जंगली पशु-पक्षी व महत्त्वपूर्ण औषधीयुक्त वृक्ष लुप्त होत आहे.या पृथ्वीतलावर प्रत्येक प्राण्याचे व वृक्षांचे असने आवश्यक आहे.कारण प्रत्येक पशु-पक्षी एकमेकांवर अवलंबून असतो त्याचप्रमाणे प्रत्येक वृक्ष महत्वाची भुमिका बजावीत असते. जगातील गिधाड हा पक्षी अत्यंत महत्त्वाची भुमिका बजावीत असतो.मेलेल्या प्राण्यांचे मांस खाणे गिधाडचे काम असते.त्यामुळे तेथील परीसर शुद्ध होतो.परंतु दु:खाची बाब ही की वायुप्रदूषण व जलप्रदूषण यामुळे गिधाडांची संख्या दिवसेंदिवस घटत आहे.त्यामुळे पृथ्वीवर मानवजातीचे असने जेवढे महत्त्वाचे तेवढेच जंगलातील पशु-पक्षी व वनस्पती यांचे सुध्दा जिवन तेवढेच महत्त्वाचे आहे.तेव्हाच पृथ्वी सुरक्षीत राहील. मानवजातीने स्वत:च्या स्वार्थापोटी पृथ्वीची राखरांगोळी केली आहे.याचे पुढे चालुन महाभयानक परीणाम सर्वांनाच भोगावे लागतील आणि याचे परिणाम आपण करोना महामारीच्या रूपात भोगलेही आहे.आज मानवजातीने पुर्वेपासुन तर पश्चिम पर्यंत उत्तर पासुन तर दक्षिणे पर्यंत,आकाश-पाताळा या संपूर्ण ठीकाणी मोठ्या प्रमाणात प्रदुषणाचे जाळे पसरविले आहे.यामुळे आज पृथ्वी माता सुध्दा भयभीत आहे म्हणूनच आज आपल्याला कृत्रिम ऑक्सिजनची गरज भासत आहे.याला वाचविण्याचे दायीत्व मानवाने स्वीकारले पाहिजे.आज मानवाची रक्षा करण्याकरीता पृथ्वीला वाचविण्याचा संकल्पजगातील संपूर्ण राष्ट्रांनी घ्यायला पाहिजे. आज वृक्षलागवडच पृथ्वीला वाचवु शकते.कारण आज जगात जंगलांचे संगोपन होत नसल्याने मोठ्या प्रमाणात वनवे लागतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जंगल संपदा नष्ट होते व प्राणीमात्रांना आपले प्राण गमवावे लागते. त्याचप्रमाणे देशात व जगात दिवसेंदिवस आगीच्या सुध्दा घटना मोठ्या प्रमाणात वाढत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे वाढते तापमान व यामुळे पृथ्वीचे संतुलन डगमगत आहे हे नक्की.याला कुठेतरी थांबायला पाहिजे. वृक्ष लागवडीमुळे पावसाचे पाणी जमीनीमध्ये मुरेल व पावसाचे पाणी सरळ समुद्र किंवा नद्यामध्ये न जाता पृथ्वीच्या पोटात जाईल.यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढण्यास मोठी मदत मिळेल व उष्णतेचे प्रमाण कमी होईल.यामुळे विहीरी,तलाव व नदी नेहमी जलमग्न राहील.आज मानवाने पाण्यासाठी सरळ पाताळात प्रवेश केला आहे.म्हणजेच आज मानवाने पाण्यासाठी जमिच्या आत ७०० फुट खोलवर जाऊन बोरवेलच्या सहाय्याने आपण देवलोकातील(पाताळातील) पाणी शोषीत आहोत.मानवाची जमीनीतील पाण्याची क्षमता फक्त ५० फुटांपर्यंत आहे. परंतु मानवाचा अतिरेक हा विध्वंसाकडे किंवा विनाशाकडे न्यायला काहीच वेळ लागणार नाही. कारण मानवाच्या हातात सर्वच काही आहे. परंतु मानवाने अजुन पर्यंत निसर्गावर नियंत्रण ठेवता आले नाही.नैसर्गिक आपदासमोर मानव नेहमी हतबल होतांना दिसतो.वनवा लागले, महाप्रलय येणे,हीमकडा कोसळने, उष्णतामान वाढने,भुकंप येणे,सुनामी येणे ह्या संपूर्ण गोष्टी मानवाने स्वत:हुन ओढवलेल्या आहेत.यामुळे जगात दरवर्षी मोठ्या प्रमाणात जिवीत हाणी व वित्तीय हानी होतांना आपण पहातो. पृथ्वी मानवजाती के लिये मेहमान है, मालक नहीं ही बाब मानवांनी लक्षात ठेवली पाहिजे व पृथ्वीचे रक्षण करून संपूर्ण जीवसृष्टीला वाचवण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न व्हायला पाहिजे.वन्यजीव दिनाच्या निमित्ताने मी सर्वांना आग्रह करतो की नैसर्गिक ऑक्सिजन, प्राणीमात्रांना चारा, प्राणांचे संरक्षण यासाठी जंगल तोड थांबवा व मोठ्या प्रमाणात वृक्षलागवडीवर भर द्या.यामुळे गुरांना चारा व सर्वांना शुद्ध हवा आणि शुद्ध ऑक्सिजन मिळेल.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापिठ प्रतिनिधी, नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९.**

---

## फारूक भाई कुरेशी यांची जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती



**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील अजित दादा चे कट्टर समर्थक जाफराबाद नगरपंचायत चे माजी नगरसेवक,माजी सभापती यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्ह्याचे नेते माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी मोठी जबाबदारी दिली आहे. माजी नगरसेवक फारूक भाई कुरेशी यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जालना जिल्हा उपाध्यक्षपदी निवड केली आहे त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे संपूर्ण जिल्ह्यातून तालुक्यातून तसेच जाफराबाद शहरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे. त्यांचा सत्कार करताना वेळेस जाफराबाद तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष दत्तू अंभोरे, तालुका उपाध्यक्ष माजी नगरसेवक बाळकृष्ण हिवाळे, सेवा दलाचे तालुकाध्यक्ष माणिकराव वायाळ जाफराबाद शहराध्यक्ष ॲड. विनोद दिगे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी अनेक लोकांनी शेत फारुख यांचे अभिनंदन केले.

## वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे यांची शेतकरी आत्महत्या कुटूंबास भेट

**जालना । प्रतिनिधी -** अंबड तालूक्यातील वडीगोद्री येथील नैराश्यग्रस्त शेतकरी पृथ्वीराज बबन काळे (वय ४३) यांनी ७ ऑक्टोबर, २०२३ रोजी आत्महत्या केली होती. या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबियांची वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॾ निलेश हेलोंडे पाटील यांनी आज सांत्वनपर भेट घेतली. या पीडित परिवाराच्या समस्या जाणून घेत त्यांना शासनाच्या वतीने देण्यात येणारी सर्व मदत करण्याची ग्वाही दिली.

शेतकऱ्यांनी आलेल्या परिस्थितीसमोर हार न मानता आपल्या एका चुकीच्या निर्णयामुळे परिवाराची होणारी आबाळ लक्षात घेऊन परिस्थितीशी दोन हात करण्यासाठी खंबीर उभे राहण्याची गरज आहे. शासन व प्रशासन शेतकरी बांधवाच्या पाठीशी सदैव ठाम असल्याचे ॾ निलेश हेलोंडे पाटील यांनी सांगितले. यावेळी तहसीलदार कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यांच्यासह काळे परिवारातील सदस्य व गावकरी उपस्थित होते.

---

### महाराष्ट्र विधानसभा तालिका अध्यक्षपदी आ बबनराव लोणीकर यांची निवड

## जालना जिल्हा भरात भाजपा कार्यकर्त्यांच्या वतीने फटाके फोडून पेढे वाटून आनंदोत्सव साजरा



**जालना । प्रतिनिधी -** गोरगरीब कष्टकरी शेतकरी शेतमजूर कामगार वंचित विस्थापितांना त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्याकरिता गेली ४० वर्ष अविरत संघर्ष करणारे, राज्याच्या राजकारणातला प्रदीर्घ अनुभव असलेले कणखर लोकप्रिय नेते महाराष्ट्र राज्याचे माजी पाणीपुरवठा व स्वच्छता खात्याचे मंत्री परतूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांची आज महाराष्ट्र विधानसभेच्या सभागृहात तालिका अध्यक्षपदी सर्वानुमते निवड झाली. महाराष्ट्र विधानसभेच्या सभागृहात तालिका अध्यक्ष पदी झालेल्या जालना जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला असून जिल्हाभरात भारतीय जनता पक्ष व महायुतीच्या कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी फटाके फोडून पेढे वाटून आनंद उत्सव साजरा केल्याचे पहावयास मिळाले.

भारतीय जनता पक्षाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी गेली ४० वर्ष सतत कार्यरत राहून महाराष्ट्र विधानसभा सदस्य पदाची निवडणूक आठ वेळा लढवली त्यात ते पाच वेळा विजयी झाले. माननीय श्री देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री असताना पाणीपुरवठा व स्वच्छता खात्याची जबाबदारी आमदार बबनराव लोणीकर यांच्यावर सोपविण्यात आली होती. या पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पद व जालना जिल्ह्याचे पालकमंत्री पद आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडे असताना त्यांनी राज्यभरात स्वच्छता खात्याअंतर्गत सुमारे एक कोटी स्वच्छताग्रहास प्रत्येकी १२ हजार रुपये अनुदान दिल्याने महाराष्ट्र राज्य हागणदारी मुक्त होऊन स्वच्छतेच्या बाबतीत देशभरातून महाराष्ट्र राज्य एक नंबर ला आले होते. पाणीपुरवठा खात्याच्या माध्यमातून त्यांनी देश विदेशात जाऊन विशेष अभ्यास दौरा करून मराठवाडा वॉटर ग्रीड योजना अस्तित्वात आणली होती. मराठवाडा वॉटर ग्रीड योजना त्यांनी त्यांनी यशस्वीपणे राज्यभरात राबवून तत्कालीन मंत्रीपदाच्या काळात आपल्या कार्याची चुणूक दाखवली होती. मृत अवस्थेत असलेले पाणीपुरवठा व स्वच्छता खाता त्यांनी राज्यात एक नंबरला आणलं होतं. राज्यभरात विधानसभा मतदारसंघांच्या तुलनेत त्यांनी स्वतःचा असलेला परतूर विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकासाकरिता केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून हजारो कोटी रुपये निधी खेचून आणत मतदार संघात केलेला विकास, मतदार संघातील मजबूत टिकाऊ गुळगुळीत डांबरी रस्ते सिमेंट रस्ते गावागावात झालेले सिमेंट रस्ते नाल्या सभामंडप सभागृह यासह मंठा व परतुर शहरात अद्यावत स्मशान भूमी नाट्यगृह क्रीडा संकुल मागासवर्गीय मुलींचे वस्तीग्रह उड्डाणपूल कोर्ट इमारत या विकास कामांचा त्यांचा राजकीय अनुभव पाहता आज विधानसभेच्या सभागृहात आमदार बबनराव लोणीकर यांची तालिका अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. अभिनंदनचा ठराव होताच विधानसभेच्या सर्व सदस्यांनी अभिनंदन करून आमदार बबनराव लोणीकर यांना शुभेच्छा दिल्या.

## ॲड सुरेश काळे यांना नाशिक येथे सामाजिक कार्यासाठी महाराष्ट्र गौरव पुरस्कार



**परतुर । प्रतिनिधी -** नुकत्याच पार पडलेल्या दि.२ मार्च २०२५, रोजी सामाजिक, राजकीय, वैद्यकीय ,विधी, क्षेत्रात यांचे उत्कृष्ट असे कार्य आहे अशा मान्यवरांचा सुप्रीम हुमान राईट इंडिया संस्थेकडून महाराष्ट्र गौरव म्हणून या कार्यक्रमात पुरस्कार देऊन सन्मान केला.

त्याच अनुषंगाने मराठवाड्यातील जालना जिल्ह्यातील ॲड. सुरेश काळे यांना सामाजिक कार्याच्या अनुषंगाने पद्मश्री परशुराम खुणे यांच्या हस्ते महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले या कार्यक्रमाप्रसंगी सुप्रीम हुमान राईट इंडिया चे संस्थापक अध्यक्ष श्रीराम बागल त्याचप्रमाणे आपला महाराष्ट्र साप्ताहिकाचे संपादक ज्ञानेश्वर सुराशे, सिने अभिनेत्री ईषिका सूर्यवंशी, मा.प्रमोद जाधव, (अखिल भारतीय मराठा महासंघ राष्ट्रीय कोषाध्यक्ष) ॲड. नितीन ठाकरे (सरचिटणीस मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक) तसेच भरत जोशी (चित्रपट निर्माता) अंजली आकळे (सिने अभिनेत्री) यासुद्धा उपस्थित होते.

या पुरस्काराबद्दल ॲड. सुरेश काळे यांचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

# पुरुष सक्षमीकरण काळाची गरज - दत्ता गवळी




**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** महिला आर्थिक विकास मंडळ तर्फे घेण्यात आलेल्या माविम मित्र मंडळ कार्यशाळेत मार्गदर्शन करताना लिंग समभाव या विषयावर बोलताना पुरुष सक्षमी करणांवर भर दिला पुरुष सक्षमीकरणावर का गरजेचा आहे या संदर्भाने ते म्हणाले भारतीय संस्कृतीचे मूल्य पालकांनी लक्षात घेतले तर येणारी पिढी समाज नीतीमुल्यापासून दूर जाणार नाही सामाजात घडणाऱ्या अघटित घटना पासून आपण आपल्या मुला मुलींना वाचवू शकतो. संस्कृती मूल्य ही कुटुंबातून समाजातून शाळेतून जपणे गरजेचे आहे.

मविम जाफराबाद तालुका व्यवस्थापक श्रीमती मीना साळवे यांनी माविम् मित्र मंडळ यांना दिला जाणारा पुरस्कार व त्याचे निकष कोणते यावर प्रकाश टाकला व मित्र मंडळ कशा पद्धतीने सक्षम करता येईल यावर मार्गदर्शन केले कृषी खात्याचे सन्माननीय मोकळे साहेब यांनी कृषी खात्यातील विविध योजना यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाच्या यशवितेसाठी सहयोगिनी श्रीमतीअरुण साळवे श्रीमती सविता लहाने आणि आणि श्रीमती चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी प्रशिक्षणार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# टेंभुर्णीच्या नगरपंचायतला मुहूर्त केव्हा?

## नगरपंचायत स्थापना करण्यासाठी मागणी

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** जाफ्राबाद तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या टेंभुर्णी नगरीचे नगरपंचायत रूपांतर केव्हा होणार असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत दरम्यान ग्रामविकासासाठी टेंभुर्णीला आता नगरपंचायतीचा दर्जा मिळणे गरजेचे असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे दहा महिन्यांवर येऊन ठेपलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीपूर्वी या ग्रामपंचायतचे नगरपंचायत मध्ये रूपांतर करावे अशी मागणी होत आहेत २० हजार पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या टेंभुर्णी गावची १७ सदस्य ग्रामपंचायत ही जाफाबाद तालुक्यातील सर्वात मोठी एकमेव ग्रामपंचायत आहे सन.१९९० पासून या ग्रामपंचायतीची सदस्य संख्या १७ आहे सद्या :गावातील मतदारांची संख्या ११४५१ वर आहे दरम्यान मागील ३५ वर्षापासून १७ सदस्यीय ग्राम पंचायत असलेल्या या ग्रामपंचायतीचे नगरपंचायतील रूपांतर होणार तरी केव्हा असा प्रश्न ग्रामस्थांना पडला आहे टेंभुर्णी गावचे लवकर नगरपंचायतील रूपांतर करावे अशी मागणी जनतेतून होत आहे ३५ वर्षापासून १७सदस्यीय ग्रामपंचायत कार्यरत १० महिन्यावर निवडणूक टेंभुर्णी ग्रामपंचायत ची निवडणूक जानेवारी २०२५ मध्ये होणार आहे त्यामुळे गावकऱ्यांची लक्ष आता दहा महिन्यांवर येऊन ठेपलेल्या या निवडणुकीकडे लागले आहे येणारी निवडणूक ही ग्रामपंचायतची निवडणूक न होता नगरपंचायत ची निवडणूक व्हावी अशी अपेक्षा ग्रामस्थ बोलून दाखवीत आहे यासाठी पीआरसीचे अध्यक्ष आमदार संतोष पाटील दानवे यांच्या विशेष पुढाकार घ्यावा अशी अपेक्षाही जनतेतून व्यक्त केली जात आहे ११ हजार चारशे एक्कावन सद्या. तिथी टेंभुर्णी गावातील मतदारांची संख्या ११हजार चारशे एक्कावन असून मागील ३५ वर्षापासून १७ सदस्य ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रूपांतर होणे गरजेचे आहे (चौकट ) ग्रामविकासासाठी नगरपंचायत गरजेची पुढारी नगरपंचायत झाल्यास जनतेला अधिकाराचा कर भरावा लागेल अशी भीती दाखवतात मात्र कर भरावा लागला तरी नगरपंचायतीला मिळणारा निधी हा ग्रामपंचायत तील पेक्षा कितीतरी पटीने मोठा असल्याने त्यातून ग्रामविकास लवकर जाता येतो यासाठी गावचे नगरपंचायतील रूपांतर होणे फारच गरजेचे आहे टेंभुर्णी ग्रामसभेमध्ये ठराव झाला होता मंजूर सध्या टीमवर मी गावची वाढती व्याप्ती पाहता त्यासाठी ग्रामपंचायतीला मिळणार निधी हा अपुरा पडतो टेंभुर्णी नगरपंचायत व्हावी म्हणून यापूर्वीच ग्रामसभा व मासिक सभेत ठराव मंजूर करण्यात आला आहे मात्र सदरील ठराव आतापर्यंत वरिष्ठ कार्यालयास का पाठवला नाही हे अद्याप तरी गुलदस्त्यात आहे यासाठी अशी मागणी टेंभुर्णी जनतेकडून होत आहे.

एका नागरिकाने, आपले नाव न सांगण्याच्या अटीवर, आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की, खरंच टेंभुर्णीच्या विकासासाठी टेंभुर्णी ची नगरपंचायत नगरपालिका होणे गरजेचे असतानाही, केवळ टेंभुर्णी तल्या लोकांच्या इच्छाशक्तीमुळे, टेंभुर्णी ची नगरपंचायत होऊ शकत नाही. टेंभुर्णीत अनेक राजकीय मंडळी असतानाही, टेंभुर्णीच्या लोकसंख्येच्या आधारावर टेंभुर्णी चा हक्क असतानाही, मागील काही दिवसापूर्वी जालना जिल्ह्यात झालेल्या नगरपंचायत त्यावेळेस टेंभुर्णी ची नगरपंचायत होणे गरजेचे असतानाही, टेंभुर्णीच्या राजकारणात असलेल्या सर्वांनाही कुठेही असं वाटलं नाही की आपली नगरपंचायत व्हावी, टेंभुर्णीचा सर्वांगीण विकास व्हावा हीच इच्छाशक्ती टेंभुर्णीच्या लोकांमध्ये असायला हवी, तरच सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्व राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांच्या इच्छा असूनही पुढे जाण्याची इच्छा ज्यांच्यामध्ये नाही त्यामुळेच विकासात्मक गोष्टी पुढे येत नाही. हीच नागरिकांची खंत आहे असं त्या नागरिकांनी कळकळीने सांगितले.

पान १ वरुन

## प्रगतशिल, विकसीत ...

बांधकाम पूर्ण झाले असून लवकरच ही बाजारपेठ शेतक-यांसाठी खुली करण्यात येईल. त्यामुळे, या भागातील रेशीम उत्पादन व उत्पादकता वाढेल. प्रधानमंत्री किसान सन्मान योजना या अंतर्गत राज्यातील ९५ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांची लाभार्थी म्हणून निवड केली असून ८७ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना बँकांद्वारे किसान क्रेडिट कार्ड सुविधा पुरविण्यात आली आहे. या उपक्रमाचा उद्देश आर्थिक सहाय्य व कर्ज सुविधा देऊन शेतकऱ्यांना सक्षम करणे हा आहे. शेतकऱ्यांना वेळेवर आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी २०२४-२५ या वित्तीय वर्षात ७४,७८१ कोटी रुपये इतके पीक कर्ज वितरित करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. बँकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ५५,३३४ कोटी रुपये इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे. हे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी तत्परतेने शासन काम करीत आहे.

चालू वर्षात गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार या योजनेअंतर्गत १२७४ जलाशयांमधून सुमारे चार कोटी घनमीटर गाळ काढला असून, तो ९५,००० एकर जमिनीवर पसरविण्यात आला आहे, त्याचा ३१,००० पेक्षा अधिक शेतकऱ्यांना लाभ झाला आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत आयोजित केलेल्या वॉटरशेड यात्रेच्या माध्यमातून पाणलोट व्यवस्थापनाच्या महत्त्वाबाबत जनजागृती करीत आहे आणि त्यातून लोकसहभागाला प्रोत्साहन देत आहे. वॉटरशेड यात्रा ८ फेब्रुवारी, २०२५ पासून सुरू झाली असून ती ३१ मार्च, २०२५ पर्यंत राज्यातील ३० जिल्ह्यांतील १४० प्रकल्पांमध्ये जाणार आहे. लोक सहभागातून शाश्वत भूजल व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी राज्यामध्ये अटल भूजल योजना कार्यक्षमपणे राबवित आहे. या योजनेअंतर्गत, संस्थात्मक बळकटीकरण, क्षमता बांधणी आणि अभिसरण घटकासाठी १३३६ कोटी रुपये इतका खर्च करण्यात आला आहे. त्यातून, १,३२,००० हेक्टरपेक्षा अधिक शेतजमीन लघु सिंचनाखाली आणण्यात आली आहे. राज्याच्या कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करणा-या शेतकऱ्यांपर्यंत विविध शासकीय योजनांचे जलद व प्रभावी वितरण सुलभ होण्यासाठी ग्रीस्टॅक-कृषी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा या नावाची एक नवीन योजना सुरु केली आहे.

शाश्वत ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी व कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी इथेनॉलचा पर्यायी इंधन म्हणून वापर करण्यावर भर देऊन, इथेनॉलचे उत्पादन व पुरवठ्याला चालना देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. २०२४-२५ या वर्षाकरिता, राज्यातील साखर कारखान्यांमार्फत तेल कंपन्यांना १२१ कोटी लिटर इथेनॉल पुरविण्याचे निर्धारित केलेले लक्ष्य पूर्ण करील. शेतकऱ्यांना सहाय्य करण्यासाठी किमान आधारभूत किंमत योजना या अंतर्गत, २०२४-२५ या हंगामात ५६२ खरेदी केंद्रांमार्फत ११,२१,३८५ मेट्रिक टन सोयाबीनची खरेदी केली आहे.

खरीप विपणन हंगाम २०२४-२५ मध्ये, सात लाख मेट्रिक टनांपेक्षा अधिक धान आणि १७१ मेट्रिक टनांपेक्षा अधिक भरड धान्य खरेदी केले आहे.प्रत्येक तालुक्यामध्ये किमान एक स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्यासाठी मुख्यमंत्री एक तालुका एक बाजार समिती योजना राबवित आहे. डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना याअंतर्गत, वैयक्तिक सौरऊर्जा कुंपण पुरविण्यासाठी संवेदनशील गावांमधील १०,००० पेक्षा अधिक लाभार्थ्यांना १५,००० रुपयांपर्यंत अनुदान वितरित केले आहे. त्यामुळे व्याघ्र प्रकल्पाच्या सभोवतालच्या व संरक्षित क्षेत्रांतील मानव-वन्यजीव यांच्यातील संघर्ष कमी होण्यास मदत होईल. राज्यभरातील नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्याची जलद पावले उचलली आहेत. ७ लाख ८० हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना ८१४ कोटी रुपये इतके आर्थिक सहाय्य वितरित केले आहे.

बीड जिल्ह्यात परळी आणि पुणे जिल्ह्यात बारामती येथे शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. उच्च शिक्षणाच्या संधी, शिष्यवृत्ती व इतर शैक्षणिक संसाधने याबद्दल इयत्ता ९वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी स्कुल कनेक्ट भाग २.० सुरू केले आहे. या उपक्रमात सुमारे १२०० महाविद्यालये, ४८०० शाळा व एक लाखापेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.

**महिला विकासाला प्राधान्य**

राज्यपाल म्हणाले की,नमो ड्रोन दीदी या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत, २०२४-२५ या वित्तीय वर्षामध्ये राज्यातील ३२५ महिला बचत गटांना कृषी प्रयोजनांसाठी ड्रोन वितरित करण्याचा निर्णय घेतला आहे. महिला कामगारांच्या सहभागाचा दर वाढविण्यासाठी आणि शहरांमध्ये महिलांना परवडणारी व सुरक्षित निवासव्यवस्था उपलब्ध करुन देण्यासाठी, केंद्र सरकारच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२४-२५ या अंतर्गत काम करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे बांधण्याची बाब प्रस्तावित केली आहे. महिलांकरिता रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी अंगणवाडी सेविकांची सुमारे १८,००० रिक्त पदे भरण्याची भरती प्रक्रिया सुरू केली आहे.

महिलांचे कौटुंबिक उत्पन्न वाढविण्यासाठी लखपती दीदी उपक्रम राबवित आहे. आतापर्यंत, १७ लाख महिलांनी, त्यांचे कौटुंबिक उत्पन्न एक लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक वाढविण्यात यश मिळविले आहे. शासनाने, २०२४-२५ च्या अखेरपर्यंत २६ लाख ग्रामीण भागातील महिलांना लखपती दीदी बनवून सक्षम करण्याचे ध्येय आहे. राज्यातील विविध समाजाच्या उन्नतीसाठी १८ महामंडळे स्थापन केली आहेत. त्यासाठी, प्रत्येक महामंडळाला, ५० कोटी रूपये इतके भाग भांडवल मंजूर करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व त्यांचे योगदान याबाबत मुलांना शिक्षण देण्यासाठी आणि त्यांच्या जीवनापासून प्रेरणा घ्यावी याकरिता अंगणवाडीत दरवर्षी छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे. अनुसूचित जमातींच्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शासकीय वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळावा या उद्देशाने अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षांसाठी अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांकरिता शिकवणी वर्ग सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

**शिक्षण संधीमध्ये वाढ**

राज्यपाल म्हणाले की, महाराष्ट्राने संपूर्ण देशात राष्ट्रीय मुल्यांकन आणि मान्यता परिषदेने (नॅकने) मान्यता दिलेल्या महाविद्यालये व विद्यापीठे यांची सर्वाधिक संख्या असलेले सर्वोच्च स्थान प्राप्त केले आहे. ही बाब शिक्षणाचा दर्जा सुधारणेतील राज्याची असलेली बांधिलकी अधोरेखित करते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करत आहे आणि या प्रयोजनासाठी आवश्यक आर्थिक तरतुदी करण्यात येत आहेत. नाशिकचा रामायणकालीन वारसा जतन करण्यासाठी आणि त्याचे सर्वंकष तीर्थस्थळात रुपांतर करण्यासाठी नाशिक येथे राम-काल-पथ प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे. महापे, नवी मुंबई येथे अत्याधुनिक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि संसाधनांनी सुसज्ज असा महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प सुरु केला आहे. या प्रकल्पामुळे सायबर गुन्ह्यांना सहज बळी पडणा-या विशेषतः महिला, लहान मुले व ज्येष्ठ नागरिक यांच्या संदर्भात घडणा-या सायबर गुन्ह्यांचे अन्वेषण करण्यामध्ये पोलीस कर्मचाऱ्यांना मदत होईल.

**आरोग्य सुविधांचे बळकटीकरण**

राज्यपाल म्हणाले की, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यात १० वर्षे सेवा केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार त्यांना, आरोग्य सेवेतील मान्यताप्राप्त समकक्ष पदांवर सामावून घेण्यात येईल. केमोथेरपी व रेडिओथेरपी केंद्रांमध्ये, कर्करोग रुग्णांवर उपचार करण्यासाठी कर्करोगशास्त्रातील कुशल परिचारिकांच्या उपलब्धतेसाठी पोस्ट बेसिक डिप्लोमा इन ऑन्कॉलॉजी नर्सिंग हा पाठ्यक्रम सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय आरोग्य सेवा कर्मचारी वर्गाचे बळकटीकरण करण्यासाठी नाशिक, सिंधुदुर्ग व सातारा या जिल्ह्यांमध्ये तीन नवीन बी.एससी. परिचर्या महाविद्यालये स्थापन करण्यात येतील.

महाराष्ट्राला वैद्यकीय संशोधन व नाविन्यपूर्ण उपक्रमाचे केंद्र बनविण्यासाठी आणि प्रगत संशोधन व शिक्षण याद्वारे सार्वजनिक आरोग्याच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी कॉंसोर्टिया फॉर हेल्थ, अप्लाइड नॉलेज अँड रिसर्च ऑटोनॉमी या कंपनीची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या अंतर्गत असलेली महाराष्ट्र पदव्युत्तर शिक्षण व संशोधन संस्था, केंद्र म्हणून काम करील तर, इतर सात शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, वरील संशोधन प्रयोजनासाठी सहायक केंद्रे म्हणून काम करतील. राज्यभरात रक्तदान मोहीम, अवयव दान, कर्करोग जनजागृती आणि उपचार, लठ्ठपणा जागरुकता आणि उपचार, थायरॉईड अभियान, मोतीबिंदू - अंधत्व प्रतिबंध अभियान आणि स्वच्छ मौखिक आरोग्य अभियान अशी ७ आरोग्य अभियाने सुरू केली आहेत. या विशेष अभियानांतर्गत, मार्च २०२५ पर्यंत सुमारे एक लाख लाभार्थ्यांचा समावेश करण्यात येईल. प्रत्येक व्यक्तीच्या घरापर्यंत, आयुर्वेद पोहोचविण्यासाठी देश का प्रकृती परीक्षण ही मोहीम राबवित आहे. ही मोहीम, संतुलित आरोग्य राखणे, निरोगी जीवनशैलीस चालना देणे व प्रतिकारशक्ती वाढविणे यासाठी आयुर्वेदाच्या कालौघात टिकून राहिलेल्या अनुभवसिध्द उपचार पध्दतींवर भर देते. या मोहिमेअंतर्गत, ४० लाखांपेक्षा अधिक नागरिकांची तपासणी करण्यात आली असून राज्याने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे.

**परकीय गुंतवणूकीत अग्रेसर**

राज्यपाल म्हणाले की, महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणुकीसाठी पसंतीचे राज्य असून देशातील अग्रेसर औद्योगिक राज्य असलेल्या महाराष्ट्राचे देशाच्या एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये, १४ टक्क्यांपेक्षा अधिक योगदान आहे. जानेवारी २०२५ मध्ये स्वित्झर्लंडमधील दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये, ६३ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी सुमारे १५ लाख ७२ हजार कोटी रुपये इतक्या गुंतवणुकीच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केलेल्या आहेत. त्यामुळे, राज्यात १५ लाखांपेक्षा अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होतील. राज्यात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी, औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्यातील विविध उद्योगांना सुमारे ५००० कोटी रुपये इतके गुंतवणूक प्रोत्साहन अनुदान वितरित करण्याची योजना आखली आहे.

तसेच राज्यातील औद्योगिकीकरणाला पाठबळ व प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुमारे ३,५०० एकर इतके औद्योगिक भूखंड वितरित करण्याचा निर्णय घेतला आहे. औद्योगिक जमिनीची वाढती मागणी लक्षात घेऊन, औद्योगिक प्रयोजनांसाठी १०,००० एकर जमीन अधिसूचित करण्याचा निर्णय घेतला आहे. औद्योगिकरणाला चालना देण्यासाठी, पुरवठा साखळीची कार्यक्षमता सुधारण्यासाठी आणि जागतिक दर्जाची व्यावसायिक परिसंस्था निर्माण करण्यासाठी १० एकात्मिक औद्योगिक केंद्रे व एकात्मिक मालवाहतूक केंद्रे विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्यपाल म्हणाले की, राज्याच्या वस्त्रोद्योग क्षेत्राचे बळकटीकरण व विस्तार करण्यासाठी महाराष्ट्र तांत्रिक वस्त्रोद्योग अभियान सुरू करण्यास मान्यता दिली आहे. वस्त्रोद्योगातील आपले नेतृत्व अधिक भक्कम करण्याच्या दृष्टीने, केंद्राच्या राष्ट्रीय तांत्रिक वस्त्रोद्योग अभियानाशी सुसंगत असे अभियान सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य बनले आहे. दि. १४ ते १७ फेब्रुवारी २०२५ या दरम्यान नवी दिल्ली येथे भारत सरकारने आयोजित केलेल्या भारत टेक्स-२०२५ या जागतिक कार्यक्रमात ज्ञान भागीदार राज्य म्हणून सहभाग घेतला होता. यामुळे राज्यातील वस्त्रोद्योग उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत सहभागी होण्यास मदत झाली आहे. यातून, राज्याच्या वस्त्रोद्योग क्षेत्रामध्ये गुंतवणुकीच्या व रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

**कौशल्ययुक्त रोजगार निर्मितीवर भर**

राज्यपाल म्हणाले की, राज्यातील युवकांची रोजगार क्षमता वाढविण्यासाठी आणि उद्योगांना कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत, १ लाख ३२ हजारांपेक्षा अधिक युवकांनी प्रशिक्षण घेतले आहे. शासनाने, २०२४-२५ या वर्षासाठी, १० लाख युवकांना प्रशिक्षित करण्याचे ध्येय ठेवले आहे आणि या प्रयोजनासाठी ५५०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. २०२४-२५ या वर्षामध्ये, बेरोजगार युवकांना उद्योगांशी जोडून रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी, महाराष्ट्रात जिल्हा स्तरावर ६११ पंडित दीनदयाळ रोजगार मेळावे आयोजित केले आहेत. राज्यामध्ये, यातून यावर्षी, १९,००० पेक्षा अधिक उमेदवारांना नोकऱ्या मिळाल्या आहेत.गतिमान व सुशासनाचे ध्येय साध्य करण्यासाठी त्रिसूत्री कार्यक्रम राबवित आहे. हा कार्यक्रम, शासकीय प्रक्रियेची पुनर्रचना करणे, कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढवणे व एकात्मिक मानव संसाधन प्रणाली विकसित करणे यावर भर देईल. प्रशिक्षणाद्वारे परिवर्तन साध्य करण्यासाठी, कर्मयोगी भारत कार्यक्रम या अंतर्गत आय-जीओटी प्रणालीमध्ये सुमारे पाच लाख कर्मचाऱ्यांची नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. त्यानुसार सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जात असल्याची खात्री करण्यात येणार आहे. गतिमान व गुणवत्तापूर्ण कामाची उद्दिष्टे साध्य करण्यामध्ये प्रशासकीय विभागांना प्रोत्साहन देण्यासाठी सेवाकर्मी पुरस्कार कार्यक्रम राबविण्यात येईल.

**पायाभूत सुविधांचे बळकटीकरण**

राज्यपाल म्हणाले की, नागपूर-गोवा शक्तीपीठ द्रुतगती मार्गाचे बांधकाम हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे. हा द्रुतगती मार्ग सर्वांना विश्वासात घेऊन पूर्ण करण्यात येईल. या द्रुतगती मार्गामुळे, त्या मार्गावरील प्रमुख धार्मिक व तीर्थस्थळे जोडण्यात येतील. हा द्रुतगती मार्ग, केवळ प्रवासाचा वेळच कमी करणार नाही तर, या प्रदेशातील आर्थिक विकासाला देखील चालना देईल. या प्रकल्पाची अंदाजित किंमत ८६,३०० कोटी रुपये इतकी आहे.राज्यभरातील रस्त्यांचा टिकाऊपणा वाढविण्यासाठी, रस्ते जोडणीत सुधारणा करण्यासाठी आणि सुरक्षित व अधिक कार्यक्षम वाहतूक व्यवस्थेची सुनिश्चिती करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विविध योजनांच्या अंतर्गत ७४८० किलोमीटर लांबीचे सिमेंट कॉंक्रिटचे रस्ते बांधण्याचा निर्णय घेतला आहे. पथकर नाक्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी, पथकर नाक्यांवरील गर्दी कमी करण्यासाठी व डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी दि. १ एप्रिल, २०२५ पासून राज्यभरातील सर्व पथकर नाक्यांवर केवळ फास्टॅगद्वारे पथकर भरण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्र पुरस्कृत पीएम ई-बस सेवा योजनेअंतर्गत, पहिल्या टप्प्यात, २० महानगरपालिकांसाठी १,२९० इतक्या बस मंजूर करण्यात आल्या आहेत आणि या महानगरपालिकांमध्ये बस आगार विकसित करण्यासाठी आणि मिटरच्या मागे ऊर्जेच्या पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्यात येईल. दि. १ एप्रिल, २०२५ पासून, पुढील तीन वर्षांसाठी, नवीन महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण राबविण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन इलेक्ट्रिक वाहन धोरणामध्ये इलेक्ट्रिक वाहनांना उत्तेजन देणे आणि जुनी वाहने मोडीत काढण्यास प्रोत्साहन देणे यांचा समावेश आहे. या धोरणात राज्यातील कार्बनची मात्रा कमी करण्यावर आणि वाहतूक अधिक पर्यावरणपूरक करण्यावर भर देण्यात आला आहे. राज्याच्या शहरी भागात उत्तम पायाभूत सुविधांद्वारे शहरी जीवनमान सुधारण्यासाठी नगरोत्थान महाभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी कटिबध्द आहे. या योजनेअंतर्गत, पाणीपुरवठा, मलनिस्सारण व रस्ते विकासासाठी सुरु असलेले प्रकल्प दोन वर्षात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राज्याची ऊर्जा साठवणूक व व्यवस्थापन क्षमता बळकट करण्यासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारीतून उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठीच्या धोरणानुसार १३ अभिकरणांशी ३८ प्रकल्पांसाठी सामंजस्य करार केले आहेत. या प्रकल्पांद्वारे ५५,९७० मेगा वॅट वीज निर्मिती होणार आहे आणि राज्यामध्ये २ लाख ९५ हजार कोटी रुपये इतकी गुंतवणूक अपेक्षित असून ९०,००० पेक्षा अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

राज्यभरातील ४०९ नागरी समूहांमध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) राबवित आहे. या योजनेअंतर्गत दोन लाखांपेक्षा अधिक घरे बांधण्यात आली असून, १ लाख ८५ हजारांपेक्षा अधिक घरांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण याच्या पहिल्या टप्प्यांतर्गत राज्यामध्ये १२ लाख ६४ हजारांपेक्षा अधिक घरकुलांचे बांधकाम पूर्ण केले आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा २ या अंतर्गत, १६ लाख ८१ हजारांपेक्षा अधिक घरकुलांचे बांधकाम करण्याचा निर्णय घेतला आहे. डोंगरी भागाच्या काही विशिष्ट गरजा लक्षात घेऊन त्या पूर्ण करण्यासाठी राज्यातील २८ जिल्ह्यांमधील ७७ पूर्ण गट डोंगरी तालुका आणि १०१ उप-गट डोंगरी तालुक्यांमध्ये डोंगरी विभाग विकास कार्यक्रम राबवित आहे.

**क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन**

राज्यपाल म्हणाले की, ऑलिम्पिकसह महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्यातील खेळाडूंची कामगिरी सुधारण्याच्या उद्देशाने राज्य स्तरावर सहा उच्च कामगिरी केंद्रे आणि ३७ विभागीय क्रीडा उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्यासाठी मिशन लक्ष्यवेध ही नवीन व महत्त्वाकांक्षी योजना सुरु केली आहे. यामध्ये, मैदानी खेळ, बॅडमिंटन, मुष्टियुद्ध, भारोत्तोलन, हॉकी, कुस्ती, तिरंदाजी, नेमबाजी, रोईंग, नौकानयन, लॉन टेनिस व टेबल टेनिस या १२ ऑलिम्पिक खेळांवर लक्ष केंद्रित करण्यात येईल. राज्यातील विशेषतः विदर्भातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने, बालेवाडी येथील राज्यस्तरीय क्रीडा संकुलाप्रमाणे नागपूर येथील विभागीय क्रीडा संकुलाचा दर्जा वाढविण्याचा निर्णय घेतल्याचे राज्यपालांनी सांगितले.

भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने नागरिकांमध्ये भारतीय राज्यघटनेबाबत तसेच त्यांचे घटनात्मक हक्क आणि मुलभूत कर्तव्ये यांबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी घर घर संविधान हा कार्यक्रम सुरु केला आहे. केंद्र सरकारने मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे व केंद्र शासनाचे राज्यपालांनी आभार मानले. अभिजात मराठी भाषा दिन, अभिजात मराठी भाषा सप्ताह, अभिजात मराठी भाषेतील संशोधन क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींचा सन्मान, अभिजात मराठी भाषेचा इतिहास उलगडून दाखविणारा माहितीपट, उत्कृष्टता केंद्र व अनुवाद प्रबोधिनीची स्थापना असे कार्यक्रम हाती घेण्याचे ठरविले आहे.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा विवाद सोडविण्यासाठी वचनबद्ध आहे. सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी तज्ज्ञ वकिलांची नियुक्ती केली आहे. शासन सीमावर्ती भागामध्ये राहणाऱ्या मराठी भाषिक जनतेसाठी शैक्षणिक, वैद्यकीय व इतर विविध कल्याणकारी योजना राबवित असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

या अधिवेशनामध्ये, नवीन वित्तीय वर्षाचे अर्थसंकल्पीय प्रस्ताव, विनियोजन विधेयके व इतर विधिविधाने आपल्या विचारार्थ मांडण्यात येतील. महाराष्ट्राला अधिकाधिक समृद्धीकडे नेण्यासाठी, सन्माननीय सदस्य, कामकाजात सहभाग घेतील व या प्रस्तावांवर आपली अभ्यासपूर्ण मते मांडतील, असा विश्वास राज्यपालांनी यावेळी व्यक्त केला.

## मारवाडी समाजाचे आराध्य दैवत शितला माता मंदिर परिसरात स्वच्छता करण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** काद्राबाद येथील दर्गा बेस समोर निजाम कालीन पुर्वीचा शितलामाता मंदिर असून दर वर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा दि. १५ मार्च ते २८ मार्चपर्यंत पुजा महोत्सव करण्यात येणार आहे. सदर मंदिरामध्ये दर्शनासाठी आणि पुजासाठी अग्रवाल, माहेश्वरी, ब्राम्हण, जैन, जाट, गुजर, नाभिक असे पंचवीस ते तीस हजार मारवाडी राजस्थानी समाजातील लोकं सहकुटूंब येणार आहेत. सदर मारवाडी समाजाचे लोकं हमखास रात्री १२ ते सकाळी ८ या वेळेत जास्त संख्येने पुजाला येत असल्याचे व्हाईस ऑफ मिडीयाचे प्रदेश उपाध्यक्ष विकासकुमार बागडी यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात श्री. बागडी यांनी जालना महानगर पालिकेचे स्वच्छता विभाग प्रमुख पंडीत पवार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या पाणी वेस ते राजमहेल टॉकीज, मुर्तीवेस पर्यंत महानगर पालिकेने अतिक्रमण काढलेले आहे. त्यामुळे रस्त्यावर मातीचे ढिग असून रस्त्याची दुरावस्था



झालेली आहे. तसेच शितलामाता मंदिर परिसरात कचरा आणि घाण पसरलेली आहे. तात्काळ स्वच्छता विभागामार्फत ट्रॅक्टर लावून हा परिसर स्वच्छ करुन देण्यात यावा, मंदिर परिसरातील अनेक पथदिवे बंद असून ते तात्काळ चालू करण्यात यावे व मंदिरासमोर एका अज्ञान व्यक्तीने बेकायेदेशिरपणे मटन दुकान चालू केलेली आहे. ती त्वरीत बंद करण्यात यावी. येणार्या भाविकांना कोणताही त्रास होणार नाही, भाविकांना विनंती करण्यात येते की, सध्या शहरामध्ये गुन्हेगारी वाढली असून दर्शनासाठी येत असतांना दागिने किंवा महाग वस्तू घेऊ नये, तसेच १२ नंतरचे दर्शन टाळून सकाळी ५ ते रात्री १० असे दिवसभर दर्शन, पुजा करता येईल, असे निवेदनात नमुद करण्यात आले आहे, निवेदनावर विकासकुमार बागडी, नगरसेवक विष्णू पाचफुले, सामाजिक कार्यकर्ते मेघराज चौधरी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांनी घेतली जालना जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट

## आन्वा येथे तरुणाला झालेल्या मारहाण प्रकरणी योग्य ती चौकशी करून कारवाई करण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांनी आज दिनांक ३ सोमवार रोजी दुपारी दोन वाजता जालना जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेतलीय. आन्वा येथे तरुणाला झालेल्या मारहाण प्रकरणी योग्य ती चौकशी करून कारवाई करण्याची मागणी वाघमारे यांनी केलीय. भोकरदन येथील आन्वा या गावात कैलास बोराडे या तरुणाला गरम लोखंडी रॉडचे चटके देऊन बेदम मारहाण करण्यात आली होती. या घटनेतील एका आरोपी पोलिसांनी अटक केली असून दुसरा आरोपी अद्याप फरार आहे. तर फरार असलेल्या फरार आरोपीला तत्काळ अटक करा अशी मागणी वाघमारे यांनी पोलिस अधीक्षकांकडे केलीय. बीड प्रकरणात धनंजय मुंडे दोषी नसणार असा विश्वास व्यक्त करत या अर्थसंकल्पीय अधिवेशनात धनंजय मुंडे यांचा मंत्री पदाचा राजीनामा घेतला जाणार नाही असंही वाघमारे बोलताना म्हणालेत. गृह विभागाचे प्रशासनावर लक्ष नाही असं म्हणत देवेंद्र फडणवीसांनी पोलिस प्रशासनाला ताकद द्यावी आणि गुंडगिरी प्रवृत्तीच्या लोकांवर कडक कारवाई करावी अशी मागणी ही नवनाथ वाघमारे यांनी बोलून दाखवलीय.

या प्रकरणी पोलिसांनी केलेल्या तपासावर आमची शंका नाही मात्र या प्रकरणातील मुख्य आरोपी असलेल्या नवनाथ दौडला तात्काळ अटक करा,अन्यथा १० मार्च रोजी जालन्यातील जिल्हाधिकारी कार्यालयावर धनगर, ओबीसी समाजाच्या वतीने मोर्चा काढण्याचा ईशारा ओबीसींच्या शिष्टमंडळाने दिला आहे.ओबीसींच्या दोन शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षकांची भेट घेत हा ईशारा दिलाय.

नवनाथ वाघमारे यांनी जालना जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेतलीय. आन्वा येथे तरुणाला झालेल्या मारहाण प्रकरणी योग्य ती चौकशी करून कारवाई करण्याची



मागणी वाघमारे यांनी केलीय. भोकरदन येथील आन्वा या गावात कैलास बोराडे या तरुणाला गरम लोखंडी रॉडचे चटके देऊन बेदम मारहाण करण्यात आली होती. या घटनेतील एका आरोपी पोलिसांनी अटक केली असून दुसरा आरोपी अद्याप फरार आहे. तर फरार असलेल्या फरार आरोपीला तत्काळ अटक करा अशी मागणी वाघमारे यांनी पोलिस अधीक्षकांकडे केलीय. बीड प्रकरणात धनंजय मुंडे दोषी नसणार असा विश्वास व्यक्त करत या अर्थसंकल्पीय अधिवेशनात धनंजय मुंडे यांचा मंत्री पदाचा राजीनामा घेतला जाणार नाही असंही वाघमारे बोलताना म्हणालेत. गृह विभागाचे प्रशासनावर लक्ष नाही असं म्हणत देवेंद्र फडणवीसांनी पोलिस प्रशासनाला ताकद द्यावी आणि गुंडगिरी प्रवृत्तीच्या लोकांवर कडक कारवाई करावी अशी मागणी ही नवनाथ वाघमारे यांनी बोलून दाखवली.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.